**<u>विशेष दिवाणी मुकदमा नं.०७/२०२२ नि.क्र.५८ वरील आदेश</u>**
**<u>( हौसेराव पाटील विरुध्द प्रकाश पाटील वगैरे)</u>**
**(<u>CNR No.MHSN050004132022</u>)**

१. प्रतिवादी क्र.२ यांनी, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे कैफियत दुरुस्तीसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी मुळ दावा वाटपाकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी नि.क्र.४६ वर त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करुन वादीचा दावा व ताकीद अर्ज नाकारलेला आहे. तथापी सदर नि.क्र.४६ वरील कैफियतीमध्ये पान नं.१६ वर वरुन ९ व्या ओळीमध्ये ''वादी–प्रतिवादी यांचेत दिनांक १२.०१.२००१ रोजी ठरल्याप्रमाणे वाटप'' यामध्ये ''२००१'' असे नजरचुकीने व टंकलेखनाच्या चुकीमुळे नमूद झालेले आहे. वास्तविक ''२००१'' या ऐवजी २०२१ असे वर्ष नमूद करुन तशी दुरुस्ती करणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती झाल्यास नि.क्र.४६ कडील कैफियतीचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही अगर वादीचे कोणतेही नुकसान होत नाही. याउलट सदरची दुरुस्ती न झाल्यास प्रतिवादी क्र.२ यांचे अपरिमित व पैशाने न भरुन येणार नुकसान होणार आहे, तसेच त्यांना त्यांच्या न्यायहक्कास कायमचे मुकावे लागणार आहे. करीता प्रस्तुत प्रतिवादी यांनी त्यांचा कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्याचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी नि.क्र.५९ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रतिवादीच्या अर्जास ठाम विरोध दर्शविला. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.२ यांनी दिनांक १७.१०.२०२२ रोजी नि.क्र.४६ वर कैफियत दिलेली आहे. तेव्हापासून

कैफियतीमधील चुक का लक्षात आली नाही याचे काहीही कारण अर्जात नमूद नाही. सदरचे काम प्रतिवादीतर्फे संभाव्य मुद्दे देण्याकरीता आहे, परंतु तसे मुद्दे न देता प्रतिवादी क्र.२ यांनी काम लांबणीवर टाकण्याच्या वाईट हेतुने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी केलेली मागणी कादयाने प्रतिबंधीत केलेली आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी मोघम स्वरुपाचा अर्ज दिलेला असल्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र.२ व वादी यांच्या परस्पर विरोधी कथनांवरुन पुढील विवाद मुद्दा माझेसमोर उपस्थित होतो, त्याचा निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी यांचा कैफियत दुरुस्तीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो का ? | ..होकारार्थी |
| २ | कोणता आदेश ? | ..अंतीम आदेशाप्रमाणे. |

**<u>कारणमीमांसा</u>**

**<u>मुददा क्र.१ बाबत</u> –**

५. प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांच्या नि.क्र.४६ वरील कैफियतीमध्ये पान नं.१६ वर वरुन ९ व्या ओळीमध्ये ''वादी–प्रतिवादी यांचेत दिनांक १२.०१.२००१ रोजी ठरल्याप्रमाणे वाटप'' यामध्ये ''२००१'' असे नजरचुकीने व टंकलेखनाच्या चुकीमुळे नमूद झालेले आहे त्यापैकी ''२००१'' या ऐवजी २०२१ असे वर्ष नमूद करुन त्याप्रमाणे कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी असे शपथेवर कथन केले आहे.

६. सदर दुरुस्ती ही औपचारिक स्वरुपाची असून सदर दुरुस्तीमुळे कैफियतीतील बचावात कोणताही बदल होण्याची शक्यता नाही. प्रतिवादी क्र.२ यांनी कैफियतीत मागितलेली दुरुस्ती विचारात घेता असे दिसून येते की, सदर दुरुस्ती ही नजरचुकीने व टंकलेखनाच्या चुकीमुळे झाल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांच्या बचावात बदल होत नाही. निश्चितच प्रस्तुत प्रतिवादी यांनी कैफियत दाखल केल्यापासून पुरेसा कालावधी होवून प्रकरण मुद्दे निश्चितीस नेमले आहे. कैफियत दाखल केल्यापासून प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास लागलेल्या कालावधीबाबत कोणताही उल्लेख अर्जात नाही. परंतु असे असले तरी, दावा अदयाप पुराव्यास लागलेला नाही ही बाब वादातीत आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चे परंतुकाचे अवलोकन करता दावा कथनात दुरुस्तीची विनंती ही पुरेशा तत्परतेने दाखल आहे का किंवा गैरहेतुने उशीरा दाखल आहे का याचा प्रश्न या स्थितीस विचारार्थ उद्भवत नाही. करीता नियोजित दुरुस्ती करण्यास प्रतिवादी यांना परवानगी न दिल्यास त्यांना त्यांची बाजु मांडण्यापासून प्रतिरोधीत केल्यासारखे होवू शकेल. प्रस्तुत दावा वाटपासाठी व निरंतर मनाई हुकूमाकरीता असल्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांना कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्यास मुभा देणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांना कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्यास मुभा दिल्यामुळे दाव्याच्या गुणदोषावर कोणताही परिणाम होणार नाही. सबब मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.२ यांचा नि.क्र.५८ कडील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ यांनी १४ दिवसामध्ये कैफियत दुरुस्ती करुन घ्यावी व त्याच मुदतीत दुरुस्त कैफियतीची प्रत केसकामी सादर करावी.

३.	अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबद्दल आदेश नाही.

४.	उभय पक्षकारांनी हुकूमाची नोंद घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
MUKUL MADHUSUDAN
CHITALE
Date: 2024.06.26 11:41:54
+0530

**ठिकाण –इस्लामपूर.** **(मुकुल म. चितळे)**

**दिनांक –२४.०६.२०२४** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, इस्लामपूर.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | – | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, इस्लामपूर. |
| आदेश घोषीत दिनांक | – | २४/०६/२०२४ |
| पी. डी. एफ. चा दिनांक | – | २६/०६/२०२४ |